# सर्वधर्मसमभाव मूल्ये जोपासणारा मोहरम सण

**प्रा. डॉ. बी.व्ही.डिगोळे**
मराठी विभाग प्रमुख,
शिवजागृती महाविद्यालय, नळेगाव

बामाजीची वाडी पो. हेर ता. उदगीर जि.लातूर येथे मी लहानाचा मोठा झालो. इथल्या सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक सण-उत्सव, परंपर-रूढी, प्रथांसी तिथल्या मातीसी माझी नाळ आजही घट्ट जोडलेली आहे. नद्या, नाले, डोंगर, शिवार, झाडे-झुडपे, वेली, पाऊलवाटा मला जगण्याचे बळ देतात. आजूबाजूच्या परिसरातील देव-देवता, आसरा, म्हसोबा, पोचमा, माळावरची आई, जिरग्याचा मारोती परठोळ, मोठया भदभदीचा, चिरक्यावरचा म्हसोबा, भैरोबा, नागोबा, वाघोबा, मल्याप्पा कुमठयाचा नरसोबा, सटवाई, या देवतांना आमच्या गावात महत्वाचे स्थान आहे. गुढीपाढवा, नागपंचमी, बैलपोळा, महालक्ष्मी, दसरा, दिवाळी, वेळाआमावस्या (येळवस), शिमगा (होळी) असे कृषीजीवनातील सर्व सण-उत्सव सर्व जातीजमातीचे लोक एकत्र येऊन विशेष अशा पारंपारिक पध्दतीने आनंदाने साजरे करतात. तसेच खुदबा, ईद असे सणही एकत्र साजरे करतात. तसाच एक महत्वाचा सण-उत्सव म्हणजे मोहरम (डोला-ताबूत) होय. या सर्व परिसरातील व अगदी वाडी स्थापन होण्यापूर्वीची माहिती मला माझे आजोबा कै. रामराव संभाजी डिगोळे यांनी हयात असताना प्रत्यक्षात सांगितली आहे. त्याचा शोध मी घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

या बामाजीच्या वाडीत आज मितीला 150 घरं आहेत. मी लहान असताना म्हणजे 40 वर्षापूर्वी फक्त 40 ते 50 घरं असतील या वाडीत पूर्वी फक्त वंजारी समाजाचे एक फड आडनावाचे कुटूंब वास्तव्य करून राहत होते. हे धर्मापूरी (ता.अंबाजोगाई जि.बीड) गावातून आले. खूप दाट झाडी असल्यामुळे दिवसा सुध्दा कोणी आत जाण्याचे धाडस करत नसत. मोठ-मोठी चिंच, आंबा, पिंपळ, वड, अंजन, टाकळी-हेकळी, चिलारी, मिरगुडी, चुरचूरी, हिवर, कारं, खैर, चारोळी, मोहची, लिंबाची, टेंबूरणीची, वागाटयाची, बाभळीची इत्यादी झाडं व वेली, काटेरी झुडपांची खूप मोठी दाट गर्दी होती आणि हिंस्त्र प्राणी, पशु, पक्षी जास्त राहत असत. घुबडांचा आवाज जास्त असायचा. अवतीभवतीच्या रस्त्याने जाणारी माणसं 'भुताची वस्ती' किंवा 'घुबडवाडी' म्हणायचे. नंतर राजस्थानकडून बैलावर मिठांच्या गोण्या टाकून विकत विकत राजस्थानकडून डिगोळे आडनावाचे पाच भाऊ महाराष्ट्रात आले. या पाच भावातील एक भाऊ रोहिण्याजवळ डिगोळयाची वाडी आहे तिथे थाबला, दुसरा भाऊ या घुबडवाडीत म्हणजेच आजची बामाजीच्या वाडीत वास्तव्य करून राहू लागला. तिसरा भाऊ कुमठयात, चौथा महांडोळमध्ये तर पाचवा कुठे बेपत्ता झाला हे दफ्तरी नोंद नाही. राजस्थानहून आजही गुरू आले की, हजारो वर्षाची कुळपरंपरा सांगतात. पण या पाचव्या भावाची कुठेच नोंद नाही. गंगाखेड तालुक्यात व इतर ठिकाणी असलेले डिगोळे मात्र ते वेगळे असल्याचे सांगितले जाते. म्हणून आजही डिगोळे यांना आगाव डिगोळे म्हणून संबोधले जाते. आगाव असलेला पाचवा मूळ भाऊ कुठे आहे याचा पत्ता लागत नाही. 'आगाव डिगोळे' मात्र शिक्का माथी आहे. आगाव या शब्दाचा अर्थ लोक चांगल्या अर्थाने घेत नाहीत. 'बदमाश' या अर्थाने घेतात. मी स्वतः आजोबा हयात असताना आजोबाकडून हे सर्व माहिती घेतली आहे. मला त्यांनी जवळपास तीन पिढयांचा इतिहास सांगितला खापरपंजोबा रामजी पाटील, पणजोबा संभाजी पाटील, आजोबा रामराव पाटील (डिगोळे), वडील विठ्ठलराव डिगोळे अशी आमच्या कुळाची परंपरा सांगितली हे कुळ वारकरी सांप्रदायिक यांचे कुलदैवत जेजोरीचा खंडोबा, शिखर शिंगणापूरचा मोठामहादेव असे सांगितले तसेच सटवाई व नरसिंहाला मानणारी ही मंडळी होती. या कुळातील मूळ माणसापासून जान्हवं व तुळशीची माळ गळयात घालण्याची परंपरा, कपाळाला गोपीचंदनाचा लांब असा नाम ओढलेला. मांसाहार वर्ज्य होतं. स्त्रिया तर पुरूषांनी मांसाहार केला की, त्याला स्पर्श करत नसत, आंघोळ केले तरच घरातील वस्तूंना हात लाऊ देतात. नाही तर जनावराच्या गोठयात झोपायला लावतात. आज यात थोडीफार काळाच्या ओघात शिथिलता आली आहे. वंजारी म्हणजे वनात राहणारा भटकंती करून उदरनिर्वाह भागवणारा, विवेकशील, जिद्दी, राकट, दणकट, भेदून पुढे जाणारा, मागे न हटणारा असे मला त्यांनीच वंजारी शब्दाचा अर्थ सांगितला आहे. अतिशय कष्टाळू, मेहनती, कुशल हुशार म्हणून तर

डोंगर-दऱ्यामध्ये वास्तव्य करून राहतो. मोडेन पण वाकणार नाही उतणार नाही मातणार नाही घेतला वसा टाकणार नाही असा बाणा असलेले. या वाडीत तिसरे कुटूंब आले ते म्हणजे इसाकसाहेब (नन्हुसाब) यांचे दोन मुलं सय्यद महेबुबसाब, सय्यदसाब हे मुस्लिम कुटूंब वास्तव्यास आले. महेबूबसाब व त्यांची पत्नी हाशाबाई व सय्यदसाबाची पत्नी निजामबाई यांना रजाकाच्या काळात आजोबांनी स्वतःच्या घरात सुरक्षीत ठेवले होते. बाहेरून हातात हत्यारे घेऊन आलेल्या टोळीला आमच्या आजोबांनी आमच्या घुबडवाडीत कोणीही मुस्लिम माणूस राहत नाही असे खोटे सांगून मानवताधर्म जपला हा आदर्श आज आपण ठेवला व जोपासला पाहिजे. आजोबांना नऊ एकर जमीन महेबुबसाबने दिली होती. पण आजोबांनी ती सही सलामत परत केली. ती जमीन त्यांच्या वंशातील मुलं, नातू, पंतू कसतात. माझ्या आजोबावर व आमच्या कुटूंबावर खुपच मुस्लिम समाजातील लोकं आजही प्रेम करतात. माणूसकीचा पदर, ओलावा, जिव्हाळा कसा असतो हे यांच्याकडून शिकण्यासारखे आहे. या गावातील चौथा मूळ व्यक्ती म्हणजे मल्हारी धनगर हा 'नवकुंड झरी' या गावातून मेंढया चारत चारत आला आणि वाडीत रहिवाशी झाला. बालाघाटच्या रांगेच्या पायथ्याशी सभोवती, डोंगर अशा ठिकाणी चार घरांचे चिमुकले गाव वसले. यालाच घुबडवाडी नाव पडले. निजाम राजवटीमध्ये घुबडवाडीचे नाव बदलून बामाजीची वाडी असे करण्यात आले. बामाजीची वाडी असे नाव ठेवण्याचे कारण म्हणजे इथे पहिल्यांदा बामाजी नावाचा पहिला पुरूष आला त्याचे नाव या वाडीला देण्यात आले. तसे पाहता हेर हद्दीत ग्रामपंचायतीत येणाऱ्या 12 वाडया होत्या. त्यातल्या 8 वाडया मांजऱ्या, हाग, वक यासारखे रोग होऊन मरून गेले. उरलेले कांही गाव सोडून पोट भरण्यासाठी झाडीत गेले. फक्त जंगमवाडी, नागोबाची वाडी, जयाबायचीवाडी राऊची वाडी बामाजीची वाडी, या फक्त चार वाडया आहेत. पैकी तीन वाडयामध्ये धनगर व मुस्लिम समाज नाही. बामाजीच्या वाडीत मात्र दोन-तीन समाजाची माणसं पूर्वीपासून एकत्र नांदतात. भांडखोरही तसेच आहेत. परंतु सण-उत्सव मात्र अगदी एकतेने, बंधुभावाने पूर्वीपासून साजरे करतात. त्यातला आमच्या वाडीतील 'मोहरम' हा सण फार प्रसिध्द आहे. सर्व समाजातील या सणात स्त्रीपुरूष लहानथोर एकत्र येतात आणि सहभागी होतात. या मोहरम सणाची किंवा डोल्याची पूर्वपरंपरा फार मजेदार आहे आजोबांनी मला सांगितली आहे.

**1) डोल्याची पूर्वपरंपरा :-**

हा डोला बऱ्याच जणांना वाटतो की, मुस्लिम समाजाचा तर कांहीना वाटतो हिंदूचा आहे. याचा इतिहासही फार वैविध्यपूर्ण आहे. हा डोला आमच्या घरात होता. या डोल्याचे सर्व साहित्य एका लाकडी संदकात दावनगावी कूलुप लावून त्याची तारीख महाडीत ठेवलेला असायचा. मोहरम सण आला की, कांही दिवस डोळयाच्या स्वतंत्र घरात घेऊन जात असत. नंतर परत मूळ ठिकाणी आणून ठेवायचे. डोल्याच्या लाकडी संदकाला व साहित्याला पाळी आलेली स्त्री किंवा मांसाहार केलेला पुरूष हात लावत नसत. एवढे पावित्र्य जपण्यात यायचे. दर तीन वर्षाने डोला बसवण्याची तारीख व महिना बदलत असतो. मागे पुढे ढकलत असतो या सणादिवसी डोला बांधण्याचे सर्व काम हिंदू मुस्लिम समाजातील माणसे मिळून करत असत. फक्त फात्या तेवढे मुस्लिम समाजाचा माणूस पढत असतो. अनेक वर्षानंतर या डोल्याचा एक मोठा चांदीचा चांद गायब झाला होता किंवा हरवला असेल किंवा चोरीला गेला हे माहित नाही. पण या डिगोळे यांच्या माणसांनीच विकून खाल्ला असे सर्व लोक म्हणू लागले. माझ्या चुलतीला मुलगाच होत नव्हता. तेंव्हा तीने डोल्याला नविन चांद करून बसवला. तिला नंतर एक मुलगा झाला. आता हा श्रध्देचा किंवा योगा-योगाचा मामला असेल. पुढे या डोल्याचे साहित्य येथून घेऊन गेले आणि महेबूबसाब व सय्यदसाब यांच्या ताब्यात गेले. कोणत्या वर्षी डोला नाही बसवला तर उस्मानसाब यांना सुख पडायचे नाही. त्यांच्या स्वप्नात जायचा मग परत ते बसवायचे हा डोला नवसाला पावणारा आहे. अशी गावातील लोकांची श्रध्दा आहे. शिकलेली मंडळी या डोल्यासंदर्भात मला कांही तरी वेगळेच सांगतात की, हसन हुसेन हे दोघे भाऊ मारण्यात आले आणि त्यांचे सोंग म्हणून हा डोला बांधून आनंद व्यक्त करण्यासाठी नाचतात असे सांगितले जाते. पण माझाही यावर विश्वास बसत नाही. मला आजोबांनी या डोल्याची रचना कशी असते हे वेगळेच सांगितले आहे.

**2) डोल्याची बांधणी व रचना :-**

या डोल्याच्या आतमध्ये बारदाण्याच्या कपडयाचा एक बटवा आहे या बटव्यात गावच्या मारोतीचा शेंदूर आणि पीराचा शेंदूर व पारा असतो. तो कुणाच्याही नजरेला पडू दिला जात नाही. त्यामुळे तर डोल्यात जिवंतपणा असतो. हे तर दोन धर्मातील एकतेचे मूळ बंधन आहे. हा शेंदूर संध्याकाळच्या वेळी बारा माणसांनी मिळून बारा गावच्या मारोतीचा उजव्या अंगठयाच्या नखात काढून आणलेला आहे. शेंदूर काढण्यासाठी सुध्दा भक्ती, धैर्य आवश्यक आहे. मारोती आक्राळ विक्राळ रूप धारण करत असतो. तसेच त्या गावावर कोणतेही संकट येऊ दिलं जात नाही. गावाचे रक्षण करणारा हा हनुमान आहे. फक्त ख-या-खु-या भक्तांनाच तो स्पर्श करू देत असतो. म्हणून सर्वजण डोल्याची भक्ती करतात व आनंदाने सहभागी होतात. शेंदूर आणणा-यांची नावेही तुळशिराम, फड, विठोबा फड रामराव, डिगोळे गंगन पाटील, संभाजी फड, महाळप्पा धनगर, मल्हारी धनगर, गोविंद फड, देवराव फड, भावराव फड तर पिराचा महेबूब व सय्यद यांनी आणला आहे. असे सांगितले जाते हे आणत असताना कुठेही रस्त्याने येत असताना लघवी, परसाकड किंवा कोणाच्या घरी थांबायचे नाही असे पावित्र्य शेंदूर आणणा-या व्यक्तींनी जपले पाहिजे.

डोला हा चार विभागात बांधला जातो. एक चार पायाचा पाळण्यासारखा लाकडाचा चौरंग असतो. या चौरंगाच्या चार पायाच्या वरच्या व खालच्या बाजूला लाकूड घोळून, रंदा मारून, गोल चेंडू केल्यासारखे करून चेंडूच्या थोडं खालच्या बाजूला करकंडा (खाच) ठेवली जाते. कारण त्याला दाव्याचा आडा गच्च बसला पाहिजे. या चौरंगाला आडव्या व उभ्या तीन ते चार बोटांच्या पट्टया खिळे ठोकून मारल्या जातात. या चौरंगाच्या सभोवती अकरा, सोळा, एकेवीस वेळूच्या काठया असतात. या वेळूच्या काठयाच्या आतल्या व मधल्या बाजूला उभ्या आडव्या इतर लाकडाच्या छका-या असतात. या छका-या बांधण्याचे कौशल्य कांही जणांणाच जमत असते. आंबाडयाच्या वरपा घेऊन, त्याच्या समान साईजच्या बट्टया काढून, काळया चिकणमातीचा विशिष्ट प्रमाणात चिखल करून, आत चिखलात बुडवून बटीला थोडंसं वरपून विशिष्ट असे आडे घालून बांधण्याचे कौशल्य आहे. सर्वांना बांधता येत नाही. या छका-यांचे सर्वात वरचे टोक थोडे चपटे तासतात किंवा गोलही ठेवले जाते. कारण की, बाहेरून असणा-या मुख्य उभ्या व आतल्या छका-यांना मोठे लहान चांद बसवले जातात. या छका-यांना सूती पांढरा कपडा नागमोडी आकाराने गुंडाळण्यात येतो. तर आतल्या बाजूला मराठी चार अंकाच्या आकडयासारखे समान घराच्या रंगबीरंगी चिंध्या गुंडाळल्या जातात. वरून विविध रंगाच्या रिबीनीसारख्या लांब पट्टया काढून गुंडाळतात. छका-याच्या वरच्या आतल्या चारही बाजूला चौकण येण्यासाठी चार कोप-यांना चार छडया अशाच बांधल्या जातात. मधला हा आकार खूप महत्वाचा असतो. कारण की, डोल्याचा असतो कारण की, डोल्याचा डेरा बसवला जातो. हा डेरा पिवळणीच्या फोकाचा विठ्ठल नागोबा फड हे बनवत असत. हा डेरा बनवणे कोणालाच जमत नसे. हे डेरा बनवणारे आजोबा वारल्यानंतर लोखंडी पट्टयांचा बनवून घेतला आहे. या डे-याच्या बांधलेल्या चिखलातील बट्टया वाळल्यानंतर चार ते पाच नमुन्याच्या कुंच्या शिप्यांकडून शिवून घेतलेल्या डे-याला घालतात. हे कुंच्या कोणत्याही शिंप्याला शिवता येत नाहीत. पूर्वी हेरमध्ये गोविंद शिंपी व आमच्या वाडीतील चाँदपाशा हे शिवायचे. आता पूर्वीसारखे रेडीमेड आणले तरी तशी शोभा येत नाही. शेवटी वरच्या बाजूला चमकणा-या रेशमी कपडयाची कूंची घालतात. या डे-याला वेळूंची टोकदार उभी छकारी असते. याला सर्वात मोठा चाँद बसवला जातो. या चाँदकडे जास्तवेळ पाहिले की, डोक्यावरील टोपी व फेटा गळून पडतो. हा चाँद बसवण्याच्या एक वितभराच्या खालची बाजू गोल मंदिराच्या कळसाप्रमाणे असते. तर चाँद बसवण्याची जागा कुतुबमिनार, ताजमहाल, मस्जिदीच्या सर्वात वरच्या चांदासारखी असते. मंदिर मस्जिदीचे मिलन म्हणजे राम रहिमचे मिलन होय. सर्वांचा देव अल्ला एकच आहे. याचे हे द्योतक आहे. डे-याच्या वरच्या टोकापासून चौरंगाच्या आडव्या लाकडापर्यंत एक मोठी सोल असते. ती गच्च आवळून बांधतात आणि मध्यभागी त्या सोलत एक लाकडाचे टिपरू घोळून पिळकांडं देतात म्हणजे हालू नये. मान कोणीकडेही पिळकू नये म्हणून बांधले जाते. डोला खांद्यावर घेऊन कितीही नाचले तरी तो पिळकू नये म्हणून खबरदारी घेतली जाते. 'शिर सलामत तो पगडी पचास' या उक्तीप्रमाणे म्हणजे ईश्वराचे अल्हाहाचे शिर आहे. ते झुकू द्यायचे नाही. असेही म्हटले जाते. हा डेराचा मोठा चाँद म्हणजे आकाशातील चंद्रच आहे असा विश्वास सर्वांचा असतो आणि खालचे छोटे छोटे चाँद म्हणले चांदण्या

आहेत चांदणे ज्याप्रमाणे शांत शितल प्रकाश देते. त्याप्रमाणे या डोल्याचा चाँद हा समाजातील भांडण तंटे, द्वेष, मत्सर, भेदभाव नष्ट करून शांतता निर्माण करण्याचे प्रतिक आहे. शेंदूर आणि पारा ज्या बारदाण्याच्या बटव्यात बंद ठेवलेला असतो. तो बटवा आतमध्ये बांधला जातो. तोपर्यंत डोल्यात जिवंतपणा नसतो. चौरंगाच्या खालून सात, नऊ फूट, अकरा फूटाच्या दोन वाळलेल्या बाभळ, खैर, जांभळीच्या दांडया रंदा मारून घोळून ठेवलेल्या असतात. त्या बांधतात. या दांडयाना कोठेही खण राहू नये याची काळजी घेतली जाते. कारण की, खांद्यावर घेऊन नाचताना लागू नये याची खबरदारी घेतली जाते. तरीसुध्दा डोला खांद्यावर घेऊन हालकीच्या तालावर नाचले की, खांदा सुजून येतो पू भरल्यासारखे दुखत असते. पंधरा पंधरा दिवस खांद्याची गाठ उतरत नसते. पण कोणीही हा त्रास सांगत नाही. कारण की, एक तर आनंदासाठी, भक्तीसाठी, श्रध्देसाठी हा डोला घेऊन नाचलेले असते. जर दुसऱ्याला सांगितले तर डोल्याची भक्ती कमी होते. असे समजतात. या डोल्याच्या दोन दांडयाच्या मध्यभागी डोल्याचा पुजारी फात्या बोलणारा भक्त उदानी ठेऊन बसलेला असतो. उदानीत खव खव विस्तव असतो. सारखं जनार्दण्या उद टाकून धूर केला जातो.

**3) डोल्याची विधीवत पूजा :-**

गावातील विविध जातीधर्मातील लोक डोला उठण्याच्या आदल्या दिवसी तांब्याच्या तांब्यात पाणी बाजरी गहू या धान्याचे पिठ व गूळ इलायची, बडीसोप, खोबर याचे मिश्रण करून मलिदा पदार्थाचे नैवेद्य दाखवतात. नारळ हळद-कुंकू, लिंबाचे तोरण, जनार्धनी उद अगरबत्ती सानंवर लाकूड घासून काडलेला गंध घेऊन येतात डोल्याच्या दांडयाना पाणी घालतात कुंकू हळद आणि मलिद्याच्या नैवद्य दाखवतात. अशावेळी मौलवी, पुजारी हा कांही तरी फात्या म्हणतो आणि स्त्री पुरूष नैवद्य दाखवणाऱ्यांच्या डोक्यावर मोराच्या पिसांचा फडा आपटतो आणि शुभाशीर्वाद देतो. नैवेद्याचे ताट रिकामे नेऊ नये म्हणून टोपल्यात जमलेल्या मलिद्यातील दोन घास मलिदा व त्यांची रोट असलेला तुकडा ताटात प्रसार म्हणून पुजारी देतो. तांब्यात उरलेले पाणी आलव्याला गोल घातले जाते. ताटात प्रसाद म्हणून नेलेला मलिदा व रोट घरातील लहान थोर मंडळी खातात आलव्यालाही खुप महत्वाचे स्थान आहे. चंद्र पाहून कुदळ मारली जाते. आणि त्याठिकाणी खोल व चारही बाजूंनी रूंद खोदला जातो. दरवर्षी त्याच जागेवर आलवा खोदला जातो. आलव्यातील मागच्या वर्षी केलेला विस्तव पुढच्या वर्षी आलवा खोदताना निघतो. आलव्याच्या सभोवती गोल रिंगण करून 'धुला' खेळला जातो आणि कांही अंतरावर पाहणारा प्रेक्षक वर्ग बसलेला असतो. आलव्याच्या मध्यभागी हलगी वाजवणारा हलग्या थांबून हलगी वाजवतो. आजच्या हलगीवाल्यांना हलगी वाजवता येत नाही असे दिसते. कारण हलगीच्या लहान काडी व टिपऱ्याला खूप महत्व असते. देवाचा बाजा, मडयाचा बाजा, धुल्याचा बाजा, पईतऱ्याचा बाजा, मजनू खेळण्याचा बाजा, सवारी उठवण्याचा बाजा, डोला खेळताना वेगवेगळया प्रकारचे बोल टिपरं व हालगीवर पडताना बाहेर पडले पाहिजेत तर खेळाचा पाऊल किंवा ठेका धरता येतो. कावडचाल, बारीक घोडी नाचते तशी चाल, डंगचिंग, डंगचिंग असं वाजविलं तर खेळता येते व लोकांनाही आवडत असते. हा डोला शक्यतो फिरून जरी आला तरी त्या त्या महिन्यातील एकादशीला बसतो आणि बारसीला उठत असतो व पाण्यात पडत असतो.

**4) खेळ व सोंगाचे स्वरूप :-**

चंद्र पाहून डोल्याच्या अगोदर किमान 15 दिवस पूर्वीच्याच ठिकाणी कुदळ मारले जाते. त्या दिवसापासून धुल्ला, पईतरा, मजनू अशा प्रकारचे खेळ हालगीच्या तालावर खेळले जातात. कुदळ मारत असताना पूजा करून आलवा खोदतात. त्याही आलव्यात डोला पाण्यात पडेपर्यंत विस्तव विझू दिले जात नाही. धुल्ला हा खेळ गोल रिंगण करून गावातील सर्व जाती जमाती, धर्माचे तरूण व प्रौढ मंडळी खेळतात. हा धुल्ला हलगीच्या ठेक्यावर खेळला जातो धुला खेळत असताना हातात एखादी लाकडी काठी, टॉवेल, दस्ती घेऊन तालात खेळला जातो. धुल्ला खेळताना ''गवरीला गवरी पेटेना हलग्याला बायको रेटना'' ''हा हा रमाणी धुल्ला संध्याला पिट नाही मलिदा करा'' ''धुल्ला धुल्ला धुल्लाय आलव्यात विस्तव रूचकीचा घरात बसलाय पुचकीचा'' असे म्हणून रिंगणाच्या बाहेर बसलेल्या लोकांना उत्साहीत करतात. असा खेळ पाहून न कधी खेळणारा माणूस चार पावलं तरी धुल्ला खेळावा म्हणून खेळात सहभागी होऊन खेळतो. पाहणारा व ऐकणारा प्रेक्षक धुल्ला धुल्ला म्हणून कोरस म्हणतो. धुल्ला खेळाच्या याठिकाणी जमलेल्या लोकांना हा खेळ व असे अश्लिल बोलणे शिट्टया वाजवणे याचे

कांहीच वाटत नाही. पाहण्यासाठी स्त्रियाही आवर्जून आलेल्या असतात. हा खेळ स्त्रिया खेळत नाहीत. या खेळाचे नाव घरात व इतर वेळी काढू दिले जात नाही. धुल्ला जरी म्हटले तरी इतर वेळी अशुभ मानले जाते. हा संकेतपाळण्याची प्रथा आहे. ज्याप्रमाणे होळीच्या दिवसी उलटा हात करून बोंबलणे शुभ मानले जाते. पण इतर वेळी बोंबलणे हे अशुभ मानले जाते त्याचप्रमाणे हा सण संपल्यानंतर धुल्ला हा शब्द कोणीही काढत नाही व जेष्ठ मंडळी म्हणू देत नाहीत.

'पईतरा' खेळाचे स्वरूप धुल्ला खेळापेक्षा वेगळे आहे. दोन उभ्या लाईन करून हलगीच्या तालावर खेळले जाते. पईतरा खेळ खेळत असताना धुल्ल खेळाचे बोल वाजवले जातात तसे नसतात. विशिष्ट अशा पध्दतीने तालबध्द स्वरूपात एका लयीत तालबध्द स्वरात हलगी वाजवली जाते. ज्याप्रमाणे शाळेमध्ये लेझिम, डंबेल्स खेळले जाते. त्याप्रमाणे या पईतरा खेळाचे ताल, स्वरूप असते. या खेळात विशिष्ट वेळी एकजण हाताच्या बोटांनी शिटी वाजवल्यानंतर गिरकी घेऊन चेहरे फिरवतात. तसेच नाचत नाचत एका बाजूने खेळत असलेले खेळाडू आपली रांग तोडून दुसऱ्या रांगेच्या स्थानी जातात. तर दुसरी रांग पहिल्या रांगेच्या जागी येऊन खेळतात. या खेळाच्या वेळीही शिटया वाजवणे 'एक नाले, दोन नाले हैदर,' 'बरायमानकी दो चारोद्दीन' असे म्हणत खेळतात.

'मजनू' हा खेळ मात्र धुल्ला व पईतरा खेळापेक्षा खूप निराळा खेळ आहे. या खेळात हलगी वाजवणारा खूप पटाईत असला पाहिजे. ज्याप्रमाणे नागीण शेपटावर होऊन नाचते, थोडी जशी बारीक नाचते. त्याप्रमाणे पायाचा साधा आवाज देखील न येऊ देता खेळतात. या खेळात फक्त दोनच खेळाडू असतात हातात दोघांच्याही लाकडी काठी, टॉवेल, इत्यादी वस्तू घेऊन खेळतात. तसेच तोंडात कपडयाचा टोक धरून नागीण खेळतात. काठी उभी हातावर घेऊन काठी गोल चक्राकार फिरवून तालात खेळले जाते. तसा हा खेळ थोडा शांत स्वरूपाचा आहे. पाहणार प्रेक्षक तेवढे एकनाले दोन नाले हैदर बरायमानकी दो चारो दीन म्हणतात. पुजारी उदानीत उद घालून धूर देत असतो. मग खेळत असताना अंगात येत असते. अंगात आलेल्या व्यक्तीला डोल्याचे दर्शन घेऊ दिले जाते तसेच दोघापैकी एकजण हरल्यानंतर खेळ संपत असतो. या तिन्ही प्रकारच्या खेळातून खेळणाऱ्याच्या शरीराला भरपूर व्यायाम मिळतो. खेळताना खुप घाम गळत असतो पाहणाऱ्या प्रेक्षकांची करमणूक व मनोरंजन होत असते. यातून निर्भेळ असा आनंद प्रेक्षकांना मिळतो हा आनंद ब्रम्हानंद सहोदरांचा आनंद असतो. पहाटे चार वाजेपर्यंत हे खेळ खेळले जातात. मध्येच सोंगाडे सोंग आणतात त्यावेळी खेळ थांबला जातो आणि खेळणाऱ्यांना विश्रांतीही मिळत असते. सोंग संपल्यानंतर परत खेळाला सुरूवात होते. संध्याकाळची वेळ असूनही आणि दिवसभर शेतीतील कामे, मजूरीचे काम करूनही लोक रात्रभर जागून हे खेळ व सोंग पाहतात.

सोंगाडे जे सोंग आणतात त्याच्या स्वरूपात विविधता असते. संकेत व कल्पनाबंधही असतात. संस्कृतीचे जतन केले जाते कोणाच्या मनाला लागणार नाही, अपमान, दुःख होणार नाही अशी खबरदारी सोग सादर करताना सोंगाडे घेत असतात. अस्वल नाचवायचे सोंग, एखाद्या घोडेवाल्याचे, शाळामास्तराचे, नवरा बायकोचे, पाटलाचे एखादी स्त्रीसंबंधाचे, भिकाऱ्याचे, देवीच्या भगताच्या अंगात कसे येते याचे सोंग, पोतराज, पांगूळ, वासुदेव, बहुरूपी या लोककलावंताचे सोंग आणून हुबेहुब पात्रचित्रण वठवून नक्कल केली जाते. हास्याचा कल्लोळ पिकला जातो. चांगल्या सोंगाला व चांगल्या सोंगाडयाला लोक रूपयांच्या स्वरूपात बक्षीस देतात. डोंबाऱ्याला लोक बक्षीसही देतात. डोंबाऱ्याच्या खेळाचेही सोंग आणले जाते.

लग्नसोहळयाचे सोंग आणण्याची एक वेगळीच तऱ्हा असते. नवरा मुलाकडील वऱ्हाडी व नवरीकडील वऱ्हाडी असतात. लग्न काढण्याची पध्दत ही फार विचित्र असते. पटके बांधण्याचा कार्यक्रम केला जातो. अंगावरील एखादी कापड किंवा बसलेल्या प्रेक्षकांचे फेटे जमा करून दोन्हीकडील पाहुण्यांना फेटे जमा करून दोन्हीकडील पाहुण्यांना पटके बांधतात. तिकडे हालगी वाजत असते. कलावंतीन नाचते हलगी वाजते असे म्हणत नाच नाचत पायातील बुट चप्पल डोक्याला उभा करून कापडाने बांधतात आणि साखर म्हणून माती तोंडात घातल्यासारखे करतात एकमेकाला दोन्हीकडील वऱ्हाडी चांगले गच्च छातीला लावून भेटतात. तेवढयात चार माचव्याच्या बाजवर मस्तपैकी नवरदेव बसवून चौघांच्या खांद्यावर बाज घेऊन वाजवीत आलव्याच्या समोर नाचत आणतात बाजेवरील नवरदेवाला बाशिंग म्हणून फडा बांधला जातो. तर गळयात खेटराची माळ असते. असा नवरदेव लग्नमंडपात येतो नवरदेवाच्या नवरीला, नवरीच्या मामाला ब्राम्हणबुवा बोलावतो. तेवढयात नवरीचा मामा

एका कुत्रीला सजवून नवरी म्हणून घेऊन येतो. त्यांच्यातीलच एकजण ब्राम्हण होतो. उलटे सुलटे मंत्र म्हणतो अंतरपाट धरून सर्वांना अक्षता वाटून मंगलअष्टका म्हणून लग्न लावले जाते. मंगल अष्टका पारंपारिक न म्हणता मध्येच शिव्यांचा वापर करून म्हणतात. शेवटी लग्न संपन्न झाल्यानंतर हलगी वाजली जाते. जेवण तयार आहे जेऊन जावा असे लगेच सांगितले जाते जेवण झाल्यानंतर साडे काढून रूखवत देऊन पाहुण्याची पाठवणी करतात. नवरा मुलगा नवरीला घेऊन जाताना गावातील लोक त्यांची पाठवणी करतात नवऱ्यामुलाकडील पाहुण्यांच्या ढुंगणावर एक एक चपल बुटासह लाथ मारून त्यांची पाठवणी करतात. पाहणारा प्रेक्षक वर्ग पोट धरून आडवा पडून हसतो. एवढे वास्तवदर्शी मनोरंजन कुठेच होत नसावे. या सोंगात विनोद कधी अश्लील असतो. ज्याप्रमाणे वि.स. खांडेकरांनी शिवीला शिव असे म्हटले आहे. भक्तीरस, रौद्ररस, बीभत्स रस करूणरस, हास्यरस या सोंगामध्ये असतो. अशी सोंगं आज लोकनाटयाचा एक प्रकार बनलेली आहेत. पाटील माझी बायको हे सोंग तर खुपच प्रसिध्द आहे. नवरा बायकोचे भांडण गावातील पाटलाकडे नेले जाते. सोंगाडयामधलाच एकजण पाटील होतो. खऱ्या नवऱ्याची बायको खोटा नवरा आपले म्हणणे रेटून बोलून दुसऱ्याची बायको मिळवून दाखवत असतो असे एकापेक्षा एक वरचढ सोंग आणून लोकांचे मनोरंजन केले जाते. पाहणऱ्यांची रात्र कधी संपली हेच समजत नाही.

**6) डोला उठणे व पाण्यात पडणे :-**

डोल्याचा शेवट हा विधिवत केला जातो. कधीही केंव्हाही कसाही बसवता येत नाही. त्याचे काही कल्पनाबंध, संकेत, रूढी, परंपरेने पाळले जातात. डोल्याच्या पंधरा दिवसाने अगोदर 'सवारी' डोल्याच्या घरात बसत असते. ही डोल्याची सवारी बांधण्याची पध्दत अशी की सहा, सात फुटाची वेळूची उभी काठी, नविन आंबाडयाच्या बटीने बांधले जाते. उभ्या काठीच्या वरच्या टोकाला चांद बसवला जातो. खाली कोणत्याही रंगाची फक्त काळा रंग सोडून साडी किंवा चमकी वस्त्र गुंडाळलेले असते. शक्यतो हिरव्या रंगाचे वस्त्र गुंडाळलेले असते. ख्रिश्चन धर्माचे जसे बोध चिन्ह असते किंवा गणितातील बेरजेचे अधिक चिन्ह असते. त्याप्रमाणे असते. फक्त वरच्या टोकाला चांद असतो एवढेच वेगळे असते गणितात अधिक चिन्हात संख्या मिसळल्यानंतर संख्येत वाढ होते त्याप्रमाणे अनेक धर्माचे लोक एकत्र येऊन बहुसंख्येने वाढ होते, आनंदात सहभागी होतात. तसेच सर्वधर्मसमभावाचे प्रतिक म्हणजे ही सवारी होय. ही सवारी धरण्याचा मान माझे चुलते भगवान रामराव डिगोळे, तसेच डिगांबर डिगोळे, भानुदास फड, अन्वर सय्यद, इसाक अली, पाशुमियां यांना आहे. एकवेळा मीही सवारी धरलो होतो. भल्या पहाटे वर चांदणी पाहून त्याच वेळी आंघोळ करून ओल्या वस्त्राने स्वारी दोन्ही हाताने छातीला घट्ट दाबून धरली जाते. सवारी धरणाऱ्या माणसाला दुसरा एखादा पक्का, तरबेज असणारा माणूस आपल्या कवळयात दाबून धरतो. सोबत अनेक लोकही असतात सवारी धरून मोराती मंदिराच्या उजव्या बाजूने एक प्रदक्षिणा पूर्ण करून पिराला प्रदक्षिणा घातली जाते व डोल्याजवळ येऊन तिच्या पूर्वीच्या ठिकाणी ठेवली जाते. सवारी घेऊन देवांना फिरताना उदानी व मोरपिसांचा फडा सोबत असतो. हलगीवाला हलगी वाजवत असतो. सवारी धरणाऱ्याच्या अंगात येते असे समजले जाते. त्यामुळे सवारीसह आलव्याला गोल प्रदक्षिणा घालून डोल्याच्या घरात ठेवतात. सवारी धरणाऱ्या माणसाला दोन माणसं धरून आणून डोल्याच्या दांडीचे दर्शन घेण्यास लावतात. नंतर थोडावेळ त्या माणसास झोपवतात. तो माणूस उठला की, पाण्याने चुळ भरून परत लोकात येऊन बसतो. दिवस निघण्याच्या अगोदर म्हणजे झुंजरक्या डोला उठला जातो. मागच्या बाजूला दोन वीर खांदे देतात व पुढे दोन खांदे देणारे वीर असतात. बरायमानकी दो चारोद्दीन असे एकाच वेळी सर्वजण म्हणतात व एकदाच डोला उचलून खांद्यावर घेतात आणि हलगीच्या तालावर नाचतनाचत डोला घरासमोर व आलव्याच्या सभोवती थोडावेळ मंदिरासमोर हलगी वाजवत खेळत नाचत नेतात व बऱ्याच वेळ तिथे डोला खेळतात. उजवा हात धरून पहिल्यांदा पाटलाच्या घरी जाण्याचा मान असतो. या चार वीरांच्या अंगावर चार तांब्याच्या घागरी पाणी ओतले जाते. डोल्याच्य समोरच्या दोन दांडयाना पाणी घालून कुंकू लावून लिंबाचे तोरण व जेवढे घडतील तेवढे रूपये डोल्याला बांधले जातात. उदानीत उद टाकून मौलवी मंत्र म्हणून उदाचा धूर घरमालकाच्या समोर धरतो या विरांना पाटावर थांबवून पायावर पाणी घालून कुंकू हळद लावून पूजा केली जाते तसेच कपाळावर लांब नाम ओढला जातो वीरांच्या हातावर साखर खाण्यासाठी दिली जाते. बराच वेळ त्या घरी डोला खेळवला जातो. घरची सर्व मंडळी

सासरहून आलेली माहेरवासीन डोल्याला हळद कुंकू लावून पूजा करतात. डोल्याच्या खालून जातात मोराचा पिसारा डोक्यावर ठेऊन आशीर्वाद घेतात. असं करत करत गावात दिवस निघेपर्यंत डोला प्रत्येकाच्या घरी जातो. पैसे झालरीला बांधले जातात. कांही स्त्रियांच्या अंगात येते. डोल्याच्या बाबतीत कांही चुका झाल्या आहेत का ते पुजारी त्या अंगात येणाऱ्या स्त्री पुरूषाला विचारले जाते. त्या चुकांची दुरूस्ती नंतरच्या वर्षी होऊ देणार नाही असे वचन देतो उद घालतो. अंगात येणाऱ्या स्त्री पुरूषांना पाया पडवले जाते. तो अंगात येणारा शांत होऊन घरी जातो. मला एक यातले आश्चर्य वाटले की, निट मराठी बोलता न येणारे निरक्षर स्त्री पुरूष चांगली हिंदी भाषा अंगात आले की, बोलतात आमच्या गावातील मुक्ताबाई गोविंद केंद्रे हिच्या नेहमी डोल्याच्या वेळी अंगात येत असे. यात अंधश्रध्दा की, श्रध्दा खरे की, खोटे या वादात मला पडायचे नाही. आजही या विज्ञानयुगात असे घडते हे आश्चर्य वाटते.

नंतर हा डोला घेऊन शेजारच्या एखाद्या गावात डोला घेऊन जातात. आणि घरोघरी फिरतात. मी लहानपणापासून डोल्यासोबत जायचो व डोला घेऊन नाचायचो. हेरच्या डोल्यापेक्षा आमच्या वाडीतील डोला वजनात जड असायचा आणि मोठाही असतो. कारण की जास्त छडयाचा असल्यामुळे मोठा असतो त्या गावातील लोक आमचाच डोला घेऊन खेळायचे. दोन्ही डोले एकत्र येऊन नाचायचे. गोविंद शिंपी या व्यक्तीच्या अंगात खूप यायचे आलव्यातला जळता विस्तवाचा केंडा तोंडात धरायचा आणि बाहेर कोळसा फेकायचा हे पाहून मला फारच कमाल वाटत असे.

संध्याकाळी पाच वाजण्याच्या सुमारास डोला आपआपल्या गावी येतो. डोला खाली जमीनीवर ठेवायचा नाही. असा संकेत आहे संध्याकाळी खाली सतरंजी अंथरून वर ठेवतात. संध्याकाळी दहा ते नऊच्या सुमारास डोला नदीला घेऊन जातात. अनेक लोक सोबत जातात नदीचे पाणी डोल्याला लावतात आणि डोला थंड झाला, पाण्यात पडला असे समजात. पाण्याकडे नेताना हलगी वाजवत नेतात. पण परत आणताना मात्र हलगी वाजवत नाहीत. फक्त तोंडाने 'अलबीदा' 'अलबीदा' असे म्हणत आणून डोल्याच्या घरात अंथरूणावर खूप हलके ठेवतात पाया पडतात. जमलेले पैसे काढून घेतात. प्रतिष्ठित दोन चार माणसं किती पैसे जमा झाले ते मोजतात. संबंधीत व्यक्तीकडे ते पैसे वर्षभर जमा ठेवतात. पैसे ठेवून सर्वांच्या साक्षीने घेणारा माणूसही बैमानी करत नाही. देवाचा पैसा आहे. आपण घ्यायचा नसतो अल्लाहा पाप करतो. जर पैसे खाल्ले तर खाणाऱ्या व्यक्तीला व त्याच्या कुटुंबाला सुख, शांती, लाभ मिळत नाही. त्याला आजार जडतो. म्हणून हे पैसे बुडवायचे अथवा खर्च करण्याचे धाडस करत नाही. त्या जमलेल्या पैशातून झालेला खर्च आहे तो भागवला जातो. सोंगाडे सध्या पैसे घेऊन आणले जात आहेत हलगीवालाही पैसे देऊन दारू देऊन वाजवण्यासाठी आणला जातो. आज त्याला व्यवसायाचे स्वरूप आले आहे. मी लहान असताना डोंगरज, हेर, महांडोळ, हेरच्या वाडया, करडखेल, रोहिणा येथील लोक डोला पाहण्यासाठी, श्रध्देने खेळण्यासाठी, फुकट सोंग करण्यासाठी येत असत. काळाच्या ओघात ही प्रथा आज बंद झाली आहे. हे सोंगाडे व्यावसायिक बनले आहेत परंतु रात्रभर सर्व गावातील लहान थोर मंडळीना जागून काढायची असते म्हणून त्यांचे मनोरंजन करण्यासाठी पैसे देऊन सोंगाडे मागवले जात आहेत.

**7) निष्कर्ष :-**

कसेही असो पण या डोल्यावर श्रध्दा आजही वाडीतील लोकांची कायम टिकून आहे. जागतिकीकरण, उदारीकरण, यंत्रयुग, संगणकयुग, मोबाईलयुग, वाटसअप, इंटरनेट, फेसबुकचे युग असताना खेडे शहराच्या जवळ आले असतानाही शिक्षणाचे जाळे खेडयापर्यंत पोहचले खेडयातील तरूण उच्चशिक्षित इंजिनिअर, डॉक्टरही या डोल्याच्या उत्सवात एवढे श्रध्देने सहभागी होतात हे नवल वाटण्यासारखे आहे. एवढे मनोरंनाची साधने असतानाही आज उत्सवाची परंपरा खेडयामध्ये टिकून आहे. सर्व जाती धर्माचे लोक समतेने एकतेने बंधुभावाने एकत्र येऊन हा उत्सव साजरा करतात. हे भारतीय संस्कृतीचा अनमोल ठेवा ग्रामीण भागात आजही जोपासला जातो. पुढच्या पिढीकडे वृध्दींगत केला जातो याचे प्रत्यक्ष दर्शन मला 30 सप्टेंबर 2017 रोजी वाडीत घडले. सहभागी होऊन रात्रभर खेळल्याचा आनंद मला खुप मोठा झाला. माझ्या तीस वर्षाखालच्या आठवणींना आणि आजोबांनी सांगितलेल्या माहितीला उजाळा मिळाल्यामुळेच मी हा शोधनिबंध लिहिण्याचा प्रपंच केला आहे. यातील

सर्व तपशील माझ्या वाडीतील अनुभवातून प्रत्यक्षदर्शी कृतीतून संकलनातून मांडण्याचा हा खटाटोप आहे. यात कांही चूकाही असतील. हे मला मान्य आहे. क्षमा असावी.

**8) संदर्भ :-**

1) कै. रामराव संभाजी डिगोळे, मु.बामाचीवाडी, पो. हेर, ता. उदगीर जि.लातूर
2) संकलक - डॉ. बालाजी डिगोळे, शिवजागृती महाविद्यालय, नळेगाव ता. चाकूर जि.लातूर
3) महमुदसाहेब सय्यद, मु.बामाजीची वाडी, पो. हेर, ता.उदगीर जि.लातूर

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com